# RSVP ची कथा की व्यथा

गेल्या रविवारी संध्याकडे पार्टी होती.  जवळजवळ ३०–३५ लोकांना बोलावले होते. शनिवारी बाईचा  फोन, “अग, फक्त २० जणांचीच RSVP आली आहे, आता काय करु?” माझ्या डोळयासमोर मराठी विश्वाचे गणपती व  दिवाळी दिसायला लागले. खरे तर आपण सर्वानीच RSVP च्या गोंधळापायी होणारा काळजी व फजितीचा अनुभव घेतलेला आहे. मराठी विश्व हे आपले मोठे कुटुंब, म्हणजे त्यांचा प्रश्न आणखीनच बिकट.

गणपती व  दिवाळीसाठी कार्यक्रम काय ठेवायचा, शाळा कुठली मिळवायची आणि RSVP चा मेळ कसा घालायचा या तीन मोठया चिंता कार्यकारिणीपुढे दर वर्षी असतात. RSVP निदान  ९५ टक्के बरोबर यावी यासाठी खूप वेगवेगळे प्रयत्न करुन झाले.  खूप वेळा आठवण करुन पाहिली. न देणाऱ्यांसाठी पाच डॉलर्स जास्त घेऊन पाहिले. त्यांना वेगळया रंगाची तिकीटे देऊन शेवटी जेवण देण्याचे ठरविले. पण त्यांच्याबरोबर लहान मुले, वयस्क पालक असले की असे करतांना कार्यकर्त्यांनाच वाईट वाटायचे.

स्वागत मंचावर कायम नोंदणी करतांना “अहो RSVP का दिली नाही असे विचारले तर,

१) आम्ही भारतात गेलो होतो म्हणून द्यायची राहिली.
२) पत्रकच मिळाले नाही.
३) आज सकाळी तर केला ना फोन.
४) मला वाटले हयांनी किंवा हिने दिली असेल.
५) आम्हीं लाईफ मेंबर आहोत, मग कशाला द्यायची?
६) आम्हीं नुसते दर्शनच घेऊन जाणार आहोत. (या गर्दीत यांच्यावर लक्ष कोण ठेवणार?)
७) आम्हांला ई मेलच आली नाही. (बदललेला ई मेल ID कळवला होता का आपण?)

अशी अनेक उत्तरे मिळतात. पण तिथे आयत्यावेळी १०० लोकांचे जेवण आणायचे कसे? शाळा तर त्यांच्या कॅफेटेरियामध्ये कशालाही हातही लावू देत नाही. जास्त जेवण मागविले आणि वाया गेले तर मंडळाचे पैसे वाया जातात ही भिती व कमी पडले तर “आम्ही RSVP देऊनही आम्हांला जेवण कसे नाही ?” म्हणून सभासदांची बोलणी खावी लागतात. मंडळाला ३६ वर्षे झाली पण या अडचणीवर मात कशी मिळवायची याचे उत्तर अजूनही सापडलेले नाही.

खरे तर उत्तर अगदी सोपे आहे...

प्रत्येक सभासदाने लक्षांत ठेवून RSVP द्यावी. “एवढया लोकांच्यात एकाने न दिल्याने काय होणार?” असा विचार करु नये. कारण असा विचार २० कुटुंबानी केला तर RSVP चा आकडा शंभरने कमी होतो.
RSVP  देऊन आयत्यावेळी बदल होणार असेल तर तसे निदान २४ तास तरी आधी कळवावे.
RSVP मराठी विश्वने सांगितलेल्या तारखेपर्यंत द्यावी म्हणजे Caterers ना आधी तीन दिवस नक्की आकडा सांगणे सोईचे होते.

आमच्या मुख्य समस्या आम्ही तुम्हाला सांगितल्या. मग वेळेवर RSVP देऊन तेवढी मदत नक्की करणार ना?